महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : दहावा दिनांक : 24/09/2024 वार : मंगळवार

# महाराष्ट्रातील लोकांना कुत्र्याचे मटण खावे लागेल

## भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचे वादग्रस्त विधान, धनगर आरक्षणावर आक्रमक



**कोल्हापूर :** धनगर समाजाने शेळ्यामेंढ्या राखणे बंद केले तर महाराष्ट्रातील लोकांवर कुत्र्याचे मटण खाण्याची वेळ येईल, असे वादग्रस्त विधान भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले आहे. त्यांच्या या विधानाचे राजकीय तसेच सामाजिक वर्तुळात तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

धनगर समाजाने अनुसूचित जमातीतून (एसटी) आरक्षणाची मागणी केली आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वात या समाजाने सोममवारी येथे रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी बोलताना पडळकर यांनी उपरोक्त विधान केले. पडळकर म्हणाले, धनगर समाज ८-१० महिने शेळ्या- मेंढ्या घेऊन घराबाहेर राहतो. महाराष्ट्रातील जनतेला चांगल्या दर्जाचे मांस मिळावे म्हणून दिवसाला ३५ किलोमीटरची पायपीट करतो. पण एखाद्याच्या रानात चुकून मेंढरे गेली तर मेंढपाळाला गुराढोरासारखे मारले जाते. पोलिसही त्याची दखल घेत नाही. हा अन्याय आम्ही का सहन करायचा? धनगरांनी शेळ्या-मेंढ्या पाळणे बंद करेले तर महाराष्ट्रातील जनतेवर कुत्र्याचे मटण खाण्याची वेळ येईल.

गोपीचंद पडळकर पुढे म्हणाले, धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे ही आमची पहिली मागणी आहे. आमची मुले शिकली तर त्यांच्यावर मेंढरं पाळायची वेळ येणार नाही. धनगर नेहमीच सरकारच्या बाजूने उभा राहिला. पण आम्हाला अद्याप काहीच मिळाले नाही. त्यामुळे सरकारने धनगर समाजाला तत्काळ एसटी आरक्षण देण्याचा जीआर काढावा. धनगर समाजाकडे कोणतेही कारखाने नाहीत. त्यामुळे आम्ही आरक्षणाची मागणी करत आहोत. एक-दोन नेत्यांच्या सुतगिरण्या सोडल्या तर आमच्या समाजाचा चेअरमन दाखवा, असे आव्हानही पडळकर यांनी धनगर आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना विचारला.

उल्लेखनीय बाब म्हणजे धनगर समाजाकडून आज आरक्षणाच्या मागणीसाठी आज राज्यभर रास्ता रोको आंदोलन केले जात आहे. नेवासा तालुक्यातील धनगर आंदोलकांनी नगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील पांढरी पूल येथे रास्ता रोको आंदोलन केले. त्यात शेकडो समाजबांधवांनी सहभाग घेतला. यावेळी सरकारविरोधात जोरदार नारेबाजी करण्यात आली.

दुसरीकडे, धनगर समाजाला एसटीतून आरक्षण दिले तर जवळपास ६० ते ६५ आमदार आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, असा निर्वाणीचा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नरहरी झिरवळ यांनी सरकारला दिला आहे. राज्य सरकार कोणत्याही प्रकारचा अभ्यास न करता धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याचा निर्णय घेत आहे. त्याला आमचा ठाम विरोध आहे. त्यानंतरही सरकारने धनगर समाजाला आरक्षण देण्यासाठी जीआर काढण्याचा प्रयत्न केला, तर आमचे ६५ आमदार विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, असे ते म्हणाले.

दरम्यान, धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करुन आरक्षणाचा लाभ देण्याबाबत स्थापन केलेल्या सुधाकर शिंदे समितीस मुदतवाढ देण्यात आली आहे. यासोबतच सकल धनगर समाजाच्या अनेक मागण्या आहेत. या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत सरकार गंभीर असून सकारात्मक प्रयत्न करत आहे, असे उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी शनिवारी स्पष्ट केले.

# दिल्लीत तळ ठोकूनही त्यांचा कटोरा मोकळाच

## बावनकुळे यांची उद्धव ठाकरे यांच्यावर टीका

**मुंबई :** महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार आहे. सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीने यासाठी जोरदार तयारी केली आहे. त्यातच सत्ताधारी भाजप व शिवसेना हे दोन पक्ष अजित पवारांच्या राष्ट्रवादीला महायुतीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. पत्रकारांनी याविषयी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना छेडले असता त्यांनी काँग्रेस व राष्ट्रवादीचा शरद पवार गटच उद्धव ठाकरे यांनाच महाविकास आघाडीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत असल्याचा पलटवार केला.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला महायुतीबाहेर काढण्याच्या आरोपांत कोणतेही तथ्य नाही.

काँग्रेस व उद्धव ठाकरे यांचे पेड वर्कर असा खोटा नरेटिव्ह तयार करत आहेत. याऊलट मी तर असे म्हणेन की, काँग्रेस व शरद पवार गट मिळून उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. मविआतील घटकपक्षांनी उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन दिले. पण ते त्यांची साथ देत नाहीत. त्यांना दिल्लीत २ दिवस ताटकळत बसवून ठेवले.

स्वतः उद्धव ठाकरेही मुख्यमंत्रीपद द्या म्हणून दिल्लीत कटोरा घेऊन फिरत होते. पण दोन दिवस तळ ठोकूनही त्यांचा कटोरा मोकळाच राहिला. ठाकरे गटाचे प्रवक्ते महाराष्ट्राला उद्धव ठाकरेंची गरज असल्याचा दावा करत आहेत. पण त्यांच्याकडे दुसरे कुणीही पाहायला तयार नाही. त्यामुळे विदर्भात उद्धव ठाकरेंना महाविकास आघाडीतून बाहेर काढण्याची चर्चा रंगली आहे.

# रयत शिक्षण संस्थेत पात्र शिक्षक उमेदवारांना नियुक्त्या द्या, यासाठी पुण्यात अन्नत्याग आंदोलन सुरू

पवित्र पोर्टल मार्फत रयत शिक्षण संस्थामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना सात महिने उलटले तरी अद्याप नियुक्त्या देण्यात आल्या नाहीत. राज्यभरातील वंचित उमेदवारांना लवकरात लवकर आस्थापना बदलून नियुक्ती द्यावी, या मागणीसाठी अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती समितीचे गिरीश फोंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे आंदोलन शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर सुरू करण्यात आले आहे. पोलिसांनी आंदोलनाला विरोध केला असून अटक करण्याचा दबाव टाकला जात आहे. पोलिसांनी शिक्षक उमेदवारांना अटक केल्यास जेलमध्ये हे अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचा इशारा फोंडे यांनी यावेळी दिला.

पहिल्या टप्प्यातील विना मुलाखत निवड यादीतील उमेदवार नियुक्तीपासून वंचित आहेत. गुणवत्ता धारकांना नियुक्ती द्या. नसेल शक्य संस्थेत तर समायोजन करून स्थानिक स्वराज्य संस्थेत नियुक्ती देण्यात यावी. सरकारने पवित्र पोर्टल २०२२ मार्फत रयत शिक्षण संस्थेसाठी शिफारस पात्र केलेल्या पण सात महिन्यापासून नियुक्तीपासून वंचित असलेल्या एकूण ८०१ उमेदवारांना तात्काळ आस्थापना बदलून नियुक्तीचे आदेश देण्यात यावेत.

नियुक्तीस पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळेपर्यंत किमान वेतन कायद्यानुसार मानधन मिळावे. निवड यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते नियुक्ती मिळेपर्यंत जेवढा कालावधी लागेल तेवढ़ा कालावधी शिक्षण सेवक कालावधीमधून कमी करण्यात यावा. आणि वर्षानुवर्षे शिक्षक भरतीत पडलेला खंड आणि वयोमर्यादाचां सहानुभूतीपूर्वक विचार करून शिक्षण सेवक रद्द करावे, आदी मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

# बदलापूर प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर : विरोधकांकडून चौकशीची मागणी



**बदलापूर :** बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटर करण्यात आला आहे. आज बदलापूर पोलिसांचे पथक त्याचा ताबा घेऊन पोलिस ठाण्याकडे जात असताना त्याने पोलिसांकडून बंदूक घेऊन पोलिसांवर गोळीबार केला. त्यानंतर प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला.

आरोपी अक्षय शिंदेसोबतच पोलिस अधिकारी API निलेश मोरे यांनाही गोळी लागली आहे. या पोलिसाची प्रकृती गंभीर आहे. त्यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

आधीच्या माहितीनुसार, तळोजा कारागृहातून बदलापूर पोलिस ठाण्याकडे नेत असताना अक्षयने स्वतःवर आणि पोलिसांवर गोळीबार करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आहे. या घटनेत अक्षय शिंदे यालाही गोळी लागली आहे. आरोपीने तीन राऊंड फायर केल्याची माहिती होती.

आज बदलापूर पोलिस तळोजा कारागृहात आरोपी शिंदेला त्याच्या पत्नीने दाखल केलेल्या नव्या गुन्ह्यात अटक करण्यासाठी गेले होते. सायंकाळी साडेसहा वाजता पोलिस मुंब्रा बायपासजवळ आले असता शिंदे याने एका हवालदाराकडून शस्त्र हिसकावले आणि एका अधिकाऱ्यावर गोळीबार केला. प्रत्युत्तरात, दुसऱ्या अधिकाऱ्याने त्या व्यक्तीवर गोळीबार केला आणि तो गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**आरोपीच्या हाताला बंदूक लागलीच कशी?** - वर्षा गायकवाड

वर्षा गायकवाड म्हणाल्या की, आरोपीच्या हाताला पोलिसांची बंदूक लागलीच कशी? असे कसे काय घडू शकते. खरं तर राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला असून गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणीही गायकवाड यांनी केली आहे. तसेच गायकवाड पुढे म्हणाल्या की, या प्रकरणाची सखोल चौकशी होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ सप्टेंबर २०२४


## पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयास नॅकचा ' बी'' ग्रेड

### सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव



**पाटोदा (प्रतिनिधी)** : दि.२२ सप्टेंबर :येथिल जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित कला व विज्ञान महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक ) ने " बी " (B) ही श्रेणी ग्रेड प्रदान केला असून सर्व स्तरातून महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सप्टेंबर महिन्यात दिनांक १० आणि ११ या दिवशी राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या त्रीसदस्यीय समितीने जयभवानी महाविद्यालयास देऊन महाविद्यालयाचे वस्तुनिष्ठ गुणवत्ता मूल्यांकन केले होते.सदर समितीच्या मूल्यांकन अहवालाद्वारे " नॅक "ने महाविद्यालयास " बी " हा ग्रेड प्राप्त झाला असल्याची घोषणा काल आपल्या वेबसाईटवरून घोषणा केली. जयभवानी महाविद्यालयास "बी " हा ग्रेड प्राप्त झाला असल्याचे वृत्त पाटोदा शहरात व परिसरात पसरताच अनेक मान्यवरांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी या मूल्यांकनासाठी प्रचंड परिश्रम घेतले होते.अशी प्रतिक्रिया देताना.प्राचार्य डॉ.विश्वास कदम पुढे म्हणाले की,हे सांघिक यश असुन आमच्या प्राध्यापकांचा मला सार्थ अभिमान आहे. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद ( नॅक ) यांच्या त्रीस्तरीय समितीमध्ये अध्यक्ष म्हणुन माजी कुलगुरू प्रो.डॉ. मोहमंद इश्तीयाक, जाहिरात मिलीया इस्लामिया नोयडा उत्तर प्रदेश, सदस्य समन्वयक प्रो. डॉ.राजेंद्रन शनमुगम अर्थशास्त्र विभाग, गांधीग्राम ग्रामीण संस्था गांधीग्राम, तामिळनाडू,व प्रो. डॉ.टी.एम. जोसेफ माजी प्राचार्य निर्मला महाविद्यालय, कोट्टायम केरळ. यांचा सदस्य म्हणुन समावेश होता.

या समितीने पाटोदा येथिल ग्रामीण भागातील जयभवानी महाविद्यालयाचे गुणवत्ता मूल्यांकन करून २.४२ इतकी संस्थात्मक श्रेणी ( सीजीपीए ) महाविद्यालयास प्रदान केली. मूल्यांकन अहवाल आणि परिषदेला महाविद्यालयाने यापूर्वीच सादर केलेल्या सयं अध्ययन अहवालाच्या तपासणी अधारे राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेने जयभवानी महाविद्यालयास "बी " हा ग्रेड घोषित केला.प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मूल्यांकन प्रक्रियासाठी समन्वयक म्हणुन इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.विनोद किर्दक यांनी काम बघितले.

ग्रामीण भागातील जयभवानी महाविद्यालयाने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल राजाची फोटो जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी माजी मंत्री मा श्री शिवाजीराव दादा ,अध्यक्ष माजी आमदार मा. श्री. अमरसिंह पंडित(भैय्यासाहेब ), सचिव मा.श्री.जयभाऊ पंडित ,युवा नेते मा.श्री.विजयसिंह पंडित ,शारदा क्रिडा अकादमीचे अध्यक्ष श्री.रणवीरकाका अमरसिंह पंडित, भय्यासाहेबांचे स्वीयसाह्यक मा.श्री. अमृत गावकर नॅक विशेषज्ञ प्रा.डॉ.प्रविण सोनुने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री.प्रमोद गोरकर, लेखापाल श्री.प्रताप हातोटे, प्रा.काशीनाथ गोगुले, विकास समितीचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव, जयभवानी ज्ञव जगदंबा शिक्षण संकुलातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राध्यापक,शिक्षक यांनी प्राचार्य डॉ.विश्वास कदम, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन!केले आहे.

## मिल्लिया महाविद्यालयाचा अनिल पवार याला बॉक्सिंग स्पर्धेत सिल्वर मेडल



**बीड** : येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयातील बी.ए. तृतीय वर्षाचा विद्यार्थी खेळाडू अनिल पवार याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व भारत शिक्षण संस्थाचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माकणी जिल्हा धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 21 व 22 सप्टेंबर 2024 रोजी संपन्न झालेल्या आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेमध्ये 75 किलो वजन गटात रजत पदक (सिल्वर मेडल) मिळवले. या यशाबद्दल अनिल पवार याचे संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सलीम बिन महाफुज, सचिव श्रीमती खान सबीहा मॅडम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील, क्रीडा विभाग प्रमुख तथा उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ, उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस एस., शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. अताऊल्ला जागीरदार डॉ. फारूख सौदागर, पदव्युत्तर विभागाचे संचालक प्रोफेसर फरीद नेहरी, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ.अब्दुल अनिस, ग्रंथपाल डॉ. आमेर सलीम, डॉ. रमेश वारे, डॉ. सायरी अब्दुल्ला, करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. मोहम्मद आसेफ इकबाल, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग, डॉ. शेख रफीक, सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

## स्त्री २ ने रचला इतिहास, ६०४ कोटींची कमाई

### शाहरुख-रणबीरच्या चित्रपटाला मागे टाकले



**मुंबई** : राजकुमार राव आणि श्रद्धा कपूर स्टारर चित्रपट स्त्री 2 ने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर 600 कोटींची कमाई केली आहे. यासह हा आकडा पार करणारा पहिला हिंदी चित्रपट ठरला आहे.

चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी सोमवारी सकाळी त्यांच्या एक्स हँडलवर (पूर्वीचे ट्विटर) एक पोस्ट केली. पोस्टमध्ये त्याने लिहिले- स्त्री 2 हा टप्पा गाठणारा पहिला हिंदी चित्रपट ठरला आहे. मेट्रो ते नॉन-मेट्रो, मल्टीप्लेक्स ते सिंगल स्क्रीन आणि शहरी केंद्र ते मास मार्केट पर्यंत, स्त्री 2 विजेता आहे.

स्त्री 2 हा चित्रपट यावर्षी 14 ऑगस्ट रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात राजकुमार राव, पंकज त्रिपाठी, अपारशक्ती खुराना, श्रद्धा कपूर, अभिषेक बॅनर्जी असे कलाकार होते. या चित्रपटात वरुण धवन आणि तमन्ना भाटिया यांनी कॅमिओ केला होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन अमर कौशिक यांनी केले होते.

हा चित्रपट दिनेश विजनच्या हॉरर-कॉमेडी विश्वाचा एक भाग आहे, ज्यामध्ये स्त्री, भेडिया, मुंज्या या चित्रपटांचाही समावेश आहे.

600 कोटींच्या क्लबमध्ये प्रवेश करत, स्त्री 2 ने शाहरुख खानच्या जवान आणि पठाण, रणबीर कपूरच्या ॲनिमल आणि प्रभासच्या बाहुबली 2 च्या हिंदी आवृत्तीच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकले आहे.

चित्रपटाची मुख्य नायिका श्रद्धा कपूरने तिच्या मैत्रिणींसोबत हे यश साजरे केले. रविवारी संध्याकाळी अभिनेत्रीने मित्रांसोबत केक कापला, ज्यावर लिहिले होते - रेकॉर्ड ब्रेकिंग स्त्री.

श्रद्धा कपूरनेही तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर या सेलिब्रेशनचे फोटो शेअर केले आहेत.

## अंबादास दानवे गल्लीतील XX

### आमदार संजय गायकवाड यांची पुन्हा जीभ घसरली



**बुलढाणा** : राहुल गांधी यांच्याविषयी वादग्रस्त विधान केल्यानंतर शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांची पुन्हा एकदा जीभ सरकली आहे. बुलढाणा येथे शिवसेना ठाकरे गटाकडून जन आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला होता. यात विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार अरविंद सावंत सहभागी झाले होते. या दोन्ही नेत्यांवर संजय गायकवाड यांनी मुक्ताफळे उधळली आहेत.

संजय गायकवाड अंबादास दानवे यांच्यावर टीका करताना म्हणाले, आमदार दानवे म्हणजे गल्लीतील xत्रा आहे. तो मागच्या धारा निवडून येतो. आक्रोश मोर्चाला चारशे रुपये देऊन लोक जमा केली गेली होती. हीच दानवेची औकात आहे. जे काही बुलढाण्यात भुंकून गेला ते सगळे प्रकरण उच्च न्यायालयात आहे. मालवणचा पुतळा काही सरकारने उभारला नव्हता तो नेव्हीने उभारला होता, असेही संजय गायकवाड म्हणाले आहेत. पुढे ते म्हणाले की अरविंद सावंतची माझ्यावर बोलण्याची देखील औकात नाही.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाकडून बुलढाण्यात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला होता. यावेळी ठाकरे गटाचे अंबादास दानवे, अरविंद सावंत यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. बैलगाडीसह हा मोर्चा काढण्यात आला होता, यावेळी अंबादास दानवे यांनी जमिनीवर आसूड ओढत सरकारचा निषेध केला.

यावेळी संजय गायकवाड यांच्यावर टीका करताना अंबादास दानवे म्हणाले, राज्यातील वाचावीरांची दखल घ्यावी असे मला वाटत नाही. त्यांचा जीव किती आणि बोलतात किती. मी जरी विरोधी पक्षात असलो तरी नरेंद्र मोदींबद्दल बोलू शकत नाही. मी राज्यातील नेत्यांवर बोलू शकतो. मात्र तुम्ही सरळ राहुल गांधी यांना बोलणे योग्य नसल्याचे अंबादास दानवे म्हणाले.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, राज्यात शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. फसवणूक होत आहे. कापूस, सोयाबीन शेतकरी संकटात असून यासाठी आम्ही आक्रोश मोर्चा काढला आहे. मुख्यमंत्री कोण होईल यापेक्षा त्यांना घरी बसवणे महत्त्वाचे असल्याचे दानवे म्हणाले. मनोज जरांगे यांच्या उपोषणविषयी बोलताना दानवे म्हणाले, सरकार मनोज जरांगे यांच्याशी खोटे बोलत आहे. त्यांच्या उपोषणाची खिल्ली उडवली जात आहे. सरकारला याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा दानवे यांनी दिला आहे.

## महाराष्ट्रात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या

**चंद्रपूर** : भाजपाचे सरकार शेतकरी विरोधी असून, सोयाबीन, कापूस, ऊस, कांदा, धान उत्पादक शेतकरी अनेक समस्यांचा सामना करत आहे. शेतमालाला भाव मिळत नाही. निर्यात करु शकत नाही आणि सरकार काहीच पावले उचलत नाही. समस्यांच्या गर्तेत सापडलेला शेतकरी आत्महत्या करत आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या होत आहेत. महागाई व बेरोजगारीने जनता त्रस्त आहे पण भाजपा सरकारला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. टेंडर काढणे, भ्रष्टाचार आणि पैसा वसुली एवढेच सरकारचे काम सुरु आहे, या शब्दांत प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी हल्लाबोल सरकारवर केला.

प्रदेश काँग्रेसची विभागीय आढावा बैठक झाली. यावेळी काँग्रेसचे अनेक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस नेत्यांनी सरकारवर हल्लाबोल केला.


प्रवेश सुरू ! प्रवेश सुरू !! प्रवेश सुरू !!!

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

Sanitary Health Inspector

या कोर्ससाठी प्रवेश चालू आहेत

संपर्क : 9405109103, 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002